**वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ अंतर्गत**
**<u>व्याज सवलत अनुदान वितरीत करणेबाबत</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक बैठक-२०१४/प्र.क्र.७४/भाग-३/टेक्स-२**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- २० मार्च, २०१४**

**वाचा :-१.** शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/ प्र.क्र.१/टेक्स-२, दिनांक १ मार्च, २०१२

२. शासन शुध्दीपत्र, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/ प्र.क्र.१/टेक्स-२, दिनांक १२ मार्च, २०१२, दि. १९/७/१२ व दि.१३/८/१२

३. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/ प्र.क्र.२५७/टेक्स-२, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४

४. संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे क्र.९८१, दि.२९/१/१४ आणि क्र.३२७७, दि.१३/३/१४ ची पत्रे.

**<u>प्रस्तावना :-</u>**

वरील संदर्भीय अनुक्रमांक १ येथील दिनांक १ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याच्या नवीन वस्त्रोद्योग धोरणांतर्गत केंद्र पुरस्कृत TUF योजनेशी निगडीत दीर्घ मुदती कर्जावरील व्याज सवलत योजना जाहिर करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत या आदेशाच्या **"परिशिष्ट-अ"** मध्ये नमूद केल्याप्रमाणे २ वस्त्रोद्योग घटकास व्याज सवलत अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

राज्यातील वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ अंतर्गत केंद्र पुरस्कृत TUFS योजनेशी निगडीत दीर्घ मुदती कर्जावरील व्याज सवलत योजनेअंतर्गत या आदेशाच्या **"परिशिष्ट-अ"** मधील तपशीलाप्रमाणे २ वस्त्रोद्योग घटकास एकूण **रु.१२,८८,०००/-** ( **अक्षरी रुपये बारा लाख अठ्ठयाऐंन्शी हजार फक्त** ) इतकी रक्कम व्याज सवलतीपोटी मंजूर करुन वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२.		सदरहू वस्त्रोद्योग घटकास वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली रक्कम योजनेच्या दिशानिर्देशानुसार **बँक ऑफ महाराष्ट्र** यांचे खालील नमूद खात्यावर R.T.G.S. द्वारे वितरीत करण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| **Bank Name** | **:-** | **BANK OF MAHARASHTRA** |
| **Name of A/C** | **:-** | **BANK OF MAHARASHTRA TUFS SUBSIDY MAHARASHTRA** |
| **IFSC** | **:-** | **MAHB0000002** |
| **A/c No.** | **:-** | **60124514747** |

३.		वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली व्याज सवलतीची उपरोक्त रक्कम **बँक ऑफ इंडिया** यांनी सदर आदेशाच्या **"परिशिष्ट-अ"** मध्ये नमूद केलेल्या वस्त्रोद्योग घटकाच्या कर्ज खात्यात वितरीत करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४.		वरील प्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम संबधित बँकेस वितरीत करण्याकरीता श्रीमती अ. अ. चुरी, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच श्री. र. मो. आडे, उप सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या आदेशाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई येथून आहरीत करुन **BANK OF MAHARASHTRA, Name of A/C :- BANK OF MAHARASHTRA TUFS SUBSIDY MAHARASHTRA, IFSC :- MAHB0000002, A/c No.:- 60124514747,** यांना वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५.		यावर होणारा खर्च " मागणी क्रमांक व्ही-२, २८५१- ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (६४) केंद्र पुरस्कृत टफ (TUF) योजनेशी संबंधित वस्त्रोद्योग प्रकल्पासाठी दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याजासाठी अर्थसहाय्य योजना (२८५१५९८१) दत्तमत ३३, अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली सन २०१३-१४ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

६.		सदर शासन निर्णय, संदर्भिय अ.क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि.१५/३/२०१४ रोजी

संपन्न बैठकीत प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार तसेच उपरोक्त शासन निर्णयान्वये वस्त्रोद्योग विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**( र. मो. आडे )**
**महाराष्ट्र शासनाचे उप सचिव**

प्रति,

महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
अ.मु.स. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई
अ.मु.स. वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई
संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.
उप सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई
कार्यासन अधिकारी (रोखशाखा) (३ प्रती / कार्यासन -१७ स)
प्रवर्तक, संबधित वस्त्रोद्योग घटक (ई-मेल व्दारे)
मॅनेजर, बँक ऑफ महाराष्ट्र (टफ सेल) (ई-मेल व्दारे)
संबंधित वस्त्रोद्योग घटकाच्या स्वतंत्र नस्ती
निवड  नस्ती (टेक्स-२)

**शासन निर्णय क्रमांक बैठक-२०१४/प्र.क्र.७४/भाग-३/टेक्स-२, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- २० मार्च, २०१४ चे परिशिष्ट-“अ” (क्रमांक १ ते २)**
**क्रमांक- १**

| | |
|---|---|
| वस्त्रोद्योग घटकाचे नांव व ठिकाण | मे. पंचमणी टेक्सटाईल प्रा. लि., ६२०, कारीवली रोड, कारवली, भिवंडी, ठाणे |
| UID NO / NON UID घटक | UID क्रमांक प्राप्त |
| UID NO व दिनांक | २०१३/O/००९५९, दि.९/७/२०१२ |
| कर्ज मंजूरीचा दिनांक | १५/०२/२०१२ |
| प्रकल्प प्रकार | प्रोसेसिंग ऑफ फायबर, यार्न फॅब्रीक्स, गारमेंट आणि मेडप |
| प्रकल्प किंमत (रुपये लाखात) | १६.०० |
| बँकेचे नांव | बँक ऑफ महाराष्ट्र |
| बँकेचा प्रकार | नोडल बँक |
| TUFS अंतर्गत व्याज सवलत मंजूरी आदेशाचा क्र. व दि. | नं.६/९/२०१२-TUFS, दि.१८/०९/२०१२ |
| लागू असलेला इफेक्टीव्ह व्याज दर | ०% |
| उद्योग धोरणाअंतर्गत प्राप्त व्याज दर | --- |
| राज्य योजनेअंतर्गत देय व्याज सवलतीची अनुज्ञेय रक्कम (रु. लाखात) | ०.५३ |

(रुपये लाखात)

| **व्याज सवलत त्रैमासिकाचा कालावधी** | **व्याज सवलत त्रैमासिका चा क्रमांक** | **कर्जाची TUFS अंतर्गत व्याज सवलतीसाठी पात्र रक्कम** | **अनुज्ञेय उच्चत्तम व्याजदर टक्केवारी** | **TUFS अंतर्गत अनुज्ञेय व्याजदर टक्केवारी** | **राज्य योजने अंतर्गत अनुज्ञेय व्याजदर %** | **व्याज सवलतीची मंजूर रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१५/२/१२ ते ३१/६/१२** | **१** | **१२.१५** | **१०.५०%** | **५.००%** | **५.५०%** | **०.०२** |
| **१/४/१२ ते ३०/६/१२** | **२** | **११.९९** | **१०.५०%** | **५.००%** | **५.५०%** | **०.१६** |
| **१/७/१२ ते ३०/९/१२** | **३** | **८.८७** | **१०.५०%** | **५.००%** | **५.५०%** | **०.१२** |
| **१/१०/१२ ते ३१/१२/१२** | **४** | **८.५०** | **१०.५०%** | **५.००%** | **५.५०%** | **०.१२** |
| **१/१/१३ ते ३१/३/१३** | **५** | **७.९०** | **१०.५०%** | **५.००%** | **५.५०%** | **०.११** |
| **एकूण देय मंजूर रक्कम** | | | | | | **०.५३** |

**क्रमांक- २**

| | |
|---|---|
| वस्त्रोद्योग घटकाचे नांव व ठिकाण | मे. पिनरॅप पॅकेजींग लि., गेट नं. २६५/१, मुंबई नाशिक हायवे, हील टॉप हॉटेल जवळ,कालमगांव, शहापूर जि. ठाणे |
| UID NO / NON UID घटक | UID क्रमांक प्राप्त |
| UID NO व दिनांक | २०१२/O/०११६७, दि.२७/३/२०१२ |
| कर्ज मंजूरीचा दिनांक | ७/१०/२०११ |
| प्रकल्प प्रकार | नॉन ओवेन |
| प्रकल्प किंमत (रुपये लाखात) | ४००.०० |
| बँकेचे नांव | बॅक ऑफ महाराष्ट्र |
| बँकेचा प्रकार | नोडल बँक |
| TUFS अंतर्गत व्याज सवलत मंजूरी आदेशाचा क्र. व दि. | ६/९/२०१२, TUFS, दि.२५/०६/२०१२ |
| लागू असलेला इफेक्टीव्ह व्याज दर | ०% |
| उद्योग धोरणाअंतर्गत प्राप्त व्याज दर | --- |
| राज्य योजनेअंतर्गत देय व्याज सवलतीची अनुज्ञेय रक्कम (रु. लाखात) | १२.३५ |

(रुपये लाखात)

| **व्याज सवलत त्रैमासिकाचा कालावधी** | **व्याज सवलत त्रैमासिका चा क्रमांक** | **कर्जाची TUFS अंतर्गत व्याज सवलतीसाठी पात्र रक्कम** | **अनुज्ञेय उच्चत्तम व्याजदर टक्केवारी** | **TUFS अंतर्गत अनु-ज्ञेय व्याजदर टक्केवारी** | **राज्य योजने अंतर्गत अनुज्ञेय व्याजदर %** | **व्याज सवलतीची मंजूर रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१६/११/११ ते ३१/१२/११** | **१** | **९३.८२** | **१०.५०%** | **५.००%** | **५.५०%** | व्याज सवलत देय नाही. |
| **१/१/१२ ते ३१/३/१२** | **२** | **९७.३६** | **१०.५०%** | **५.००%** | **५.५०%** | **०.४४** |
| **१/४/१२ ते ३०/६/१२** | **३** | **२३५.३५** | **१०.५०%** | **५.००%** | **५.५०%** | **२.३४** |
| **१/७/१२ ते ३०/९/१२** | **४** | **२४४.२१** | **१०.५०%** | **५.००%** | **५.५०%** | **३.२६** |
| **१/१०/१२ ते ३१/१२/१२** | **५** | **२३७.५७** | **१०.५०%** | **५.००%** | **५.५०%** | **३.२३** |
| **१/१/१३ ते ३१/३/१३** | **६** | **२३०.३१** | **१०.५०%** | **५.००%** | **५.५०%** | **३.०८** |
| **एकूण देय मंजूर रक्कम** | | | | | | **१२.३५** |